## : अनुक्रमणिका :

पान क्रमांक


प्रस्तावना ... ... १ ते ३

प्रकरण पहिले – ऐतिहासिक पार्श्वभूमी ... ४ ते ६५

प्रकरण दुसरे – पुलोद शासनाची निर्मिती ... ६६ ते ११४

प्रकरण तिसरे – कॉंग्रेस (स) चा उदय - - - ११५ ते १५२

प्रकरण चौथे – मराठवाड्यातील कॉंग्रेस (स) ची वाढ - - १५३ ते १९३

प्रकरण पाचवे – उपसंहार - - - - - - - - १९४ ते २०८

अ – संदर्भ लेखांची सूची - - - - - २०९ ते २११

ब – संदर्भ ग्रंथांची सूची - - - - - २१२ ते २१५


=/=/=/=/=/=/=/=/=

प्रस्तावना

मराठवाड्यातील समाजवादी कॉंग्रेस एक अभ्यास (१९८०-८५) हा विषय संशोधनासाठी निश्चित करीत असताना काही उद्देश डोळ्यासमोर ठेवलेले होते.

१९७७ नंतरच्या राष्ट्रीय राजकारणाच्या प्रक्रियेत काही बदल होत गेले. या अनुषंगानेच महाराष्ट्रातील राजकारणात ही काही नवे प्रवाह विकसित झाल्याचे दिसतात. महाराष्ट्रातील कृषी-औद्योगिक समाजाची जडण घडण एका वेगळ्या सामाजिक व राजकिय चळवळीतून झालेली दिसते. या चळवळीतून आलेल्या नेतृत्वाची पकड सातत्याने तीस वर्षे राज्यांच्या राजकारणावर राहिली. १९५७ च्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या रेटयातून देखील यशवंतराव चव्हाणाने आपले संघटन कौशल्य वापरुन राज्यात कॉंग्रेसला वाचवले. या नंतरच्या राजकारणात विरोधक मात्र फारसे प्रबळ होऊ शकले नाहीत. परंतू १९७७ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात त्वरीत बदल होवू लागले. कॉंग्रेसची प्रचंड संघटना फुटली. सत्ता पक्षाच्या हातातून गेली. या संक्रमण काळात शरद पवाराचे नेतृत्व पुढे आले. त्यांनी समाजवादी कॉंग्रेस पक्षात पुढे नण्याचा प्रयत्न केला.

समाजवादी कॉंग्रेस हा नव्यानेच पुढे आलेला राजकीय पक्ष मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागांत आपली शक्ती वाढवू शकला. मराठवाडा हा सांस्कृतिक दृष्टीने व इतर अंगाने प. महाराष्ट्राच्या तुलनेत निराळाच विभाग आहे. या भागातील राजकीय जागृती व विकासाची प्रक्रिया निराळ्या स्वरुपाची आहे. त्यामुळे पवारांनी या विभागातील प्रश्नांची नाडी पकडून आपला पक्ष प्रबळ करण्यात यश प्राप्त केले. मराठवाड्यातील कॉंग्रेस (स) च्या वाढीमुळे राज्यातील राजकीय प्रक्रियेत काही नवे प्रवाह, गट पुढे असल्याचे चित्र दिसते. राज्यातील विविध विभागात चालणाऱ्या राजकीय

......

प्रक्रियेचा अभ्यास संपूर्ण राजकारण समजण्यासाठी आवश्यक असतो म्हणूनच मराठवाड्यातील काँग्रेस (स) चा उदय आणि विकास यांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे.

या विषयाचा अभ्यास करीत असताना गतकालीन घटनांचा सपशीलवार अभ्यास करणे गरजेचे आहे. यामुळे जून्या कागदपत्रांतून उपलब्ध असलेली माहीती, वृत्तपत्रांच्या मदतीने घटनांचा क्रम पाहणे गरजेचे होते. त्याच्या आधार या प्रबंधात महत्वाचा आहे.

या विषयाच्या अनुसंगाने उपलब्ध असलेल्या पुस्तकांचा व शोध निबंधाचा उपयोग या प्रबंधाच्या कामात करुन घेतलेला आहे. मराठवाड्यातील राजकीय प्रक्रियेत सहभागी असलेल्या व्यक्तींच्या प्रत्यक्ष मुलाखाती व अभ्यासकांमार्फत मिळालेली माहीतींचा वापर या प्रबंधात केला आहे. शासकीय प्रकाशित साहित्ये व कागद पत्रे या प्रबंधाच्या कामात उपयोगी ठरली.

प्रबंधाचे काम करण्यासाठी व त्याला योग्य अशी दिशा प्राप्त करुन देण्याचे कार्य माझे मार्गदर्शक डॉ. अशोक चौसाळकर ( प्रपाठक, राज्य शास्त्र विभाग) यांनी केल्यामुळेच हा प्रबंध पूर्ण करणे शक्य झाले. त्यांचे मार्गदर्शन महत्वाचे आहे.

राज्य शास्त्र विभाग प्रमुख डॉ. के. के. कावळेकर, डॉ. गोपाळ गुरु, प्रा. सुरेंद्र जोंधळे, प्रा. वासंती रासम यांचेही सहकार्य व मार्गदर्शन या कामात वेळोवेळी मिळाले.

या अभ्यासासाठी दैनिक मराठवाडा (औरंगाबाद), दै. महाराष्ट्र टाईम्स (मुंबई), दैनिक पुढारी (कोल्हापूर), विभागिय माहीती कार्यालय (औरंगाबाद),बॅ.खर्डेकर ग्रंथालय शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) या ग्रंथालयांची खुपच मदत झाली.

या प्रबंधाच्या अनुषंगाने आ. वसंत काळे, आ. विजय गव्हाणे, आण्णा खंदारे,डॉ, मोईन शाकीर, प्रा. गंगाधर पाथ्रीकर, प्रा. बा. ह. कल्याणकर, सुभाष लोमटे, प्रविण वाघ,प्रकाश सिरसाट, प्रा. सुभाष मि.

......

प्रा. सुंदर गव्हाणे, प्रा. दत्ता सोमवंशी आदींच्या सोबत झालेल्या चर्चेचा उपयोग या शोध निबंधात महत्वाचा ठरला आहे.

हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी प्रकाश देशमुख (नवशक्ती, मुंबई) प्रमोद भागवत (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई), निशिकांत भालेराव (मराठवाडा, औरंगाबाद), राम पिंपरीकर (माहीती सहायूयक, औरंगाबाद), वर्षा दिघे (माहीती सहायूयक, सातारा), उत्तम कांबळे (सकाळ कोल्हापूर) या वृत्तपत्र व्यवसायातील मित्राचे सहकार्य मिळाले.

या प्रबंधाच्या कार्यात प्रा. डी.यू. पवार, प्रा. विलास रणसुभे डॉ. संजय गोविंदराव, श्रीधर पवार, प्रा. सुभाष पाटील, प्रा. गो. मा. पवार डॉ. भाने, तोरस्कर या मित्राचे ही सहकार्य महत्त्वाचे वाटते.

एम. फील पदवी करण्याची इच्छा प्रबळ करण्याच्या कार्यात माझे स्नेही प्रा. ओम् प्रकाश कलमे व माझी पत्नी संहिता गुप्ते यांनी केलेल्या मदतीमुळेच हा प्रपंच करण्यात मी यशस्वी होवू शकलो.

प्रबंधाच्या टंक लेखानाचे काम माझे स्नेही मिराजदार एच.एस. यांनी तत्परतेने पुर्ण करून दिले, त्याचेही सहकार्य मोलाचे वाटतात. नकाशे ट्रेसिंगचे काम बी.डी. पाटील यांनी करून दिले. ज्ञात व अज्ञात असंख्य मित्रांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. त्या आधारावरच हे काम पूर्ण करता येवू शकले. धान्यवाद !

कोल्हापूर
दिनांक २८ एप्रिल ८८

(देविदास व्यं. पवार )